MHRG100005542025

**दाखल तारीख :** ०९/०७/२०२५

**नोंदणी तारीख :** ०९/०७/२०२५

**निकाल तारीख :** ०९/०३/२०२६

**कालावधी :** ०० व.,०८ म.,०० दि.

# प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड, ता. महाड, जि. रायगड यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : यु. एम. जाधव)

| **नियमित फौजदारी खटला क्र. १०८/२०२५** | **निशाणी क्र. २२/ब** |
|---|---|
| प्रथम खबर क्रमांक | २८/२०२५ |
| अहवाल/गुन्हयाचा तपशील व पोलीस ठाणे | पोलादपुर पोलीस ठाणे, ता. पोलादपुर, जि. रायगड |
| निकालाचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकारतर्फे, पोलादपुर पोलीस ठाणे |
| अभियोगपक्षातर्फे वकील | श्रीमती पी. पी. जाधव, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **अदित्य सतिश पवार,**<br>वय – १९ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,<br>रा. चोळई, ता. पोलादपुर, जि. रायगड. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. रूपेश आर. जाधव, श्री. राजेश ए. शेठ |

## भाग 'ब'

## [फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १३/०५/२०२५ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | १३/०५/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०९/०७/२०२५ |
| दोषारोप नोंदविल्याची तारीख | १४/०७/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १०/११/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | ०९/०३/२०२६ |

| | |
|---|---|
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | निरंक |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अदित्य सतिश पवार | भा.ना.सु. सं.२०२३ क.३५(३) अन्वये नोटीस | १४/०७/ २०२५ | भा.न्या.सं., २०२३ चे क.१०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) व मो.वा.का. १९८८ क.१८४, ३ (१)१८१ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

### अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्ष –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | जयेश दिलीप जगताप | ११ | पंच साक्षीदार |
| २. | विनोद तुकाराम कदम | १३ | साक्षीदार |
| ३. | बळीराम सिताराम जाधव | १९ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ४. | पांडुरंग गणपत चव्हाण | २० | साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी

**अ. अभियोगपक्ष –**

| अनु. क्र. | स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | दोषारोपपत्र | १ |
| २. | घटनास्थळाचा पंचनामा | १२ |

**ब. बचाव पक्ष –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमालाचे वर्णन –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

# न्या य नि र्ण य

**(दिनांक माहे ०९ मार्च, २०२६ रोजी पारीत)**

आरोपी विरुध्द निश्चित करण्यात आलेल्या भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१, १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब) आणि मोटर वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४, ३(१)१८१ खालील दोषारोप सिध्दतेकरीता प्रस्तुत संपरीक्षा आहे.

**अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :–**

२. दिनांक १३/०५/२०२४ रोजी १४.३० वाजताचे सुमारास मौजे कापडे बु.,गावचे हद्दीत, ता. पोलादपुर, जि. रायगड येथे आरोपी याने त्याच्या ताब्यातील ॲक्टीव्हा क्रमांक एमएच–०६/सीआर–८०६४ ही चालविण्याचा परवाना नसताना पाठीमागे राज विनोद कदम यास बसवुन महाबळेश्वर ते पोलादपुर रोडने पायटा ते पोलादपुर अशी घेवुन जावुन घटनास्थळी आल्यावर समोरून पोलादपुर बाजुने एक वाहन आल्याने गाडीचा ब्रेक मारला असता, पाठीमागे बसलेला

राज विनोद कदम याने घाबरून उडी मारल्याने आरोपीचा ॲक्टीव्हा वरील ताबा सुटुन रोडवर स्लीप होवुन अपघात झाला व त्यामुळे राज विनोद कदम याच्या मृत्युस कारणीभुत झाला. म्हणुन फिर्यादीने पोलादपुर पोलीस ठाणे येथे आरोपी विरूध्द फिर्याद दाखल केली. आरोपी विरुध्द सदर प्रकरणात गुन्हा क्रमांक २८/२०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१, १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब) आणि मोटर वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४, ३(१)१८१ अन्वये नोंदविण्यात आला.

३. पोलीसांनी तपासादरम्यान पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा, जप्ती पंचनामा व अटक पंचनामा तयार केला. तक्रारदार व इतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपी विरुध्द पुरेसा पुरावा आढळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. आरोपी विरुध्द निशाणी क्र. ०७ वर भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१, १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब) आणि मोटर वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४, ३(१)१८१ अन्वये दोषारोप निश्चित केला. आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचून दाखविले व समजुन सांगितले. आरोपीने निश्चित केलेले दोषारोप अमान्य केले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोगपक्षाच्या पुराव्यातुन साक्षीदारांचे निवेदन नोंदविण्याइतपत पुरावा आल्याने आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा अधिनियम, २०२३ चे कलम ३५१ अन्वये निवेदन निशाणी क्रमांक २१ वर नोंदविण्यात आले. त्यामध्ये त्याने खोटा खटला दाखल केल्याचा बचाव घेतला आहे.

५. अभिलेखावरील पुरावा तसेच, दोन्ही बाजुचा युक्तीवाद लक्षात घेता, पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन आले, त्यावर निष्कर्ष कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक १३/०५/२०२५ रोजी १४.३० वाजताचे दरम्यान मौजे कापडे बु. गावचे हद्दीत, ता. पोलादपुर, जि. रायगड येथे आरोपीच्या ताब्यातील ॲक्टीव्हा क्रमांक एमएच–०६/सीआर–८०६४ ही वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून हयगयीने किंवा बेदकारपणे चालवुन मानवी जिवितास धोका पोहचेल अशा पध्दतीने चालविली व त्याद्वारे आरोपीने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन स्कुटीवर मागे राज विनोद कदम यांस बसवुन महाबळेश्वर ते पोलादपुर रोडने पायटा ते पोलादपुर जात असताना अपघात करून वर नमुद कृत्य करून राज विनोद कदम यांच्या मरणास कारणीभुत ठरला व त्याद्वारे आरोपीने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १०६ (१) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ३. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमुद कृत्य करून राज विनोद कदम यास किरकोळ स्वरूपाच्या दुखापती होण्यास कारणीभुत ठरला व त्याद्वारे आरोपीने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १२५ (अ) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ४. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमुद कृत्य करून राज विनोद कदम यास गंभीर स्वरूपाच्या दुखापती होण्यास कारणीभुत ठरला व त्याद्वारे आरोपीने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १२५ (ब) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ५. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन स्कुटी ही सार्वजनिक रस्त्यावर वेगाने आणि सर्वसामान्य जनतेला अपाय होईल अशा रितीने व | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविली व त्याद्वारे आरोपीने मोटर वाहन कायदा कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | |
| ६. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन स्कुटी विना परवाना चालवित असताना मिळुन आला व त्याद्वारे आरोपीने मोटर वाहन कायदा कलम ३ (१)/१८१ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ७. | अंतिम आदेश काय ? | **..आरोपीची निर्दोष मुक्तता** |

# कारणमिमांसा

## मुद्दे क्र. १ ते ६ बाबत :–

६. मुद्दे क्रमांक १ ते ६ हे एकाच घटनेचा भाग असुन त्या अनुषंगाने आलेला पुरावा हा एकत्रीत असल्याने सर्व मुद्दे हे कारणमिमांसेकरिता एकत्रीत विचाराधीन घेण्यात येत आहेत.

७. अभियोगपक्षाने शंकेच्या पलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे की, दिनांक १३/०५/२०२५ रोजी १४.३० वाजताचे दरम्यान मौजे कापडे बु. गावचे हद्दीत, ता. पोलादपुर, जि. रायगड येथे आरोपीच्या ताब्यातील ॲक्टीव्हा क्रमांक एमएच–०६/सीआर–८०६४ ही वाहतुकीच्या नियमांकडे तसेच रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने किंवा बेदकारपणे आणि विनापरवाना चालवुन मानवी जिवितास धोका पोहचेल अशा पध्दतीने चालविली व पाठीमागे बसलेल्या राज विनोद कदम यांच्या मृत्युस कारणीभुत झाला.

८. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ जयेश हे घटनास्थळाचे पंच साक्षीदार आहेत. त्यांनी असे साक्षकथन केले की, दिनांक १४/०५/२०२५ रोजी पोलीसांनी त्यांना कापडे गावचे हद्दीत चंद्रभागा हॉटेल जवळ पंचनामा करण्यासाठी

बोलावले होते. घटनास्थळ आदित्य पवार यांनी दाखविले. घटनास्थळाच्या पश्चिमेस ॲक्टीवा उभी होती. त्याचा क्रमांक एमएच–०६/सीआर–८०६४ असा होता. घटनास्थळाच्या पुर्वेस चंद्रभागा हॉटेल, पश्चिमेस सकपाळ यांचे घर व उरलेल्या दोन्ही बाजुला पोलादपुर महाबळेश्वर हायवे होते. पंचनामा हा दुपारी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत सुरू होता. त्यांच्या साक्षीतुन अभियोगपक्षाने घटनास्थळ पंचनामा व हातनकाशा निशाणी क्र. १२ शाबीत करून घेतला.

**९.** सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला. उलटतपासादरम्यान साक्षीदार कथन करतो की, त्यांना पंचनाम्यास बोलवलेल्या दिवसांचा वार आठवत नाही. सदर साक्षीदार मान्य करतो की, ज्या गुन्हयाचा कामी पंचनाम्यासाठी ते गेले होते त्या गुन्हयाचा क्रमांक त्यांना आठवत नाही. पंचनाम्यादिवशी घटनास्थळावरील महामार्ग बंद नव्हता. पंच साक्षीदाराने जसे सांगितले आणि तसे पोलीसांनी लिहिले, असे काही घडलेले नाही. त्यांच्या मतानुसार जेथे अपघात झाला ते ठिकाण वळणाचा आहे. उर्वरित उलटतपासामधुन आरोपीस मदत होईल असे काहीही अभिलेखावर आले नाही. अभियोगपक्षाच्या साक्षीतुन घटनास्थळ पंचनामा व हातनकाशा निशाणी क्र. १२ शाबीत करून घेतला असल्याने त्याचे अवलोकन करून इतर साक्षीदार पंच साक्षीदार याच्या साक्षीस कशी बळकटी आणतात हे पाहणे उचीत होईल.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ विनोद यांना तपासण्यात आले. ते मयत राज याचे वडील आहेत. त्यामुळे त्यांची साक्ष ही अत्यंत महत्वाची आहे. त्यांनी असे साक्षकथन केले की, दिनांक १३/०५/२०२५ रोजी ते घरी होते. त्यांना ०२.४५ वाजता त्यांच्या मोठया मुलाचा फोन आला की, मुलाचा अपघात झाला आहे व तो गाडीवर पडला आहे. ते सरकारी हॉस्पीटलमध्ये गेले. त्यांनी मुलाला पाहिले. थोडया वेळाने त्यांना समजले की, त्यांचा मुलगा मयत झाला आहे. त्यांचा मुलगा राज विनोद कदम हा त्याचा मित्र आरोपी आदित्य पवार याच्या सोबत

पुजेसाठी गेला होता. त्यांना नंतर समजले की, आदित्य पवारच्या चुकीमुळे अपघात झाला आहे.

**११.** सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला. उलटतपासादरम्यान साक्षीदार मान्य करतो की, अपघात त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. उर्वरित उलटतपासामधुन आरोपीस मदत होईल असे काहीही अभिलेखावर आले नाही. या साक्षीदाराने घटनास्थळावरील परिस्थितीचे वर्णन केलेले नाही. त्यांना घटनेमध्ये आरोपीची चुक असल्याचे समजले, परंतु ती काय चुक होती व कशी झाली होती याबाबत त्यांनी काहीही भाष्य केलेले नाही. तसेच, आरोपीची अपघातामध्ये चुक आहे हे कोणाकडुन समजले त्याबाबत सुध्दा साक्षीदार क्र. २ यांनी काहीही साक्षकथन केलेले नाही. त्यामुळे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार काय साक्षकथन करतात हे पाहणे गरजेचे आहे.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ बळीराम हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन त्यांना तपासण्यात आले. त्यांनी असे साक्षकथन केले की, दिनांक १३/०५/२०२५ रोजी कापडेवरून एक स्कुटी येत होती. ते चंद्रभागा हॉटेलमध्ये काम करीत होते. चंद्रभागा हॉटेलच्या समोर कॉर्नरला स्कुटी स्लीप झाली. दोन माणसांना उचलुन हॉस्पीटलला नेले. त्यानंतर ते कामावर निघुन गेले.

**१३.** सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला. उलटतपासादरम्यान साक्षीदार मान्य करतो की, ते काम करीत असताना त्यांना अचानक आवाज आला, त्यामुळे ते बाहेर आले. उर्वरित उलटतपासामधुन आरोपीस मदत होईल असे काहीही अभिलेखावर आले नाही.

**१४.** साक्षीदार क्र. ३ हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन सुध्दा त्यांनी आरोपीची स्कुटी हॉटेलच्या समोर कॉर्नरला स्लीप झाल्याचे साक्षकथन केले. आरोपीने त्याच्या ताब्यातील स्कुटी बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे चालविल्याने

ती स्लीप झाली असे या साक्षीदाराने साक्षकथन केलेले नाही. साक्षीदार क्र. ३ हे त्याच्या हॉटेलमध्ये काम करीत असताना त्यांना अचानक आवाज आला, त्यामुळे ते बाहेर गेले. यावरून या साक्षीदाराने प्रत्यक्ष अपघात पाहिला नसल्याचे स्पष्ट होते. या साक्षीदारास आवाज आल्यानंतर तो हॉटेलच्या बाहेर गेला असावा.

**१५.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ पांडुरंग यांना तपासण्यात आले. त्यांनी असे साक्षकथन केले की, दिनांक १३/०५/२०२५ रोजी ते घरी होते. लोकं जमले होते. ते पाहण्यासाठी घरातुन बाहेर आले. तेथे एक मुलगा पडलेला होता. सर्वांनी त्याला पोलादपुरला पाठविले. तेथे एक स्कुटी होती व ती पडलेली होती. ज्याची स्कुटी होती त्याला त्यांनी पाहिलेले नाही. तेथे बरेच माणसे होती. प्रस्तुत साक्षीदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आलेला नाही. हा साक्षीदार घटनेनंतरच्या घटनास्थळावरील परिस्थितीचा साक्षीदार असुन अपघात पाहिल्याचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. तरी सुध्दा त्यांनी घटनास्थळावरील परिस्थिती कथन केली आहे. परंतु, त्यांनी आरोपीला पाहिलेले नाही तसेच आरोपीचा अपघातात निष्काळजीपणा होता किंवा कसे, याबाबत या साक्षीदाराने काहीही साक्षकथन केलेले नाही.

**१६.** अपघाताची खबर ही आरोपी यांनी दिली आहे. परंतु, अभियोगपक्षाने त्यांना फिर्यादी म्हणुन प्रस्तुत प्रकरणी त्याची फिर्याद नोंदविली आहे. घटनास्थळावर अभियोगपक्षाच्या कथनांनुसार प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व इतर लोकं सुध्दा जमले होते. तसेच, घटनेची माहिती ही मयत राज याचे वडील विनोद यांना घटनेनंतर काही कालावधीतच मिळाली होती. परंतु, त्यांपैकी कोणीही घटनेची फिर्याद दिलेली नाही. साक्षीदार क्र. १ ते ४ यांनी आरोपी हा त्याच्या ताब्यातील स्कुटी ही विनापरवाना चालवित असल्याबाबत साक्षकथन केलेले नाही. तसेच, अभियोगपक्षाने सुध्दा आरोपी हा त्याच्या ताब्यातील स्कुटी विनापरवाना चालवित होता याबाबत कोणताही पुरावा शाबीत केलेला नाही. घटनेमध्ये एकमेव साक्षीदार क्र. ३ हा घटनेचा

प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आला असुन त्याच्या साक्षीतुन घटनेमध्ये आरोपीचा बेदरकारपणा किंवा निष्काळजीपणा असल्याचे तसेच त्याने त्याच्या ताब्यातील वाहन हे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालविल्याचे सिध्द होत नाही. मयत राज यास गंभीर दुखापत होण्यास व त्याच्या मृत्युस आरोपी हा त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे किंवा बेदरकारपणे चालविल्याने आरोपी हा त्यास सर्वस्वी जबाबदार असल्याबाबतचा सक्षम, थेट, सबळ व विश्वासार्ह पुरावा उपलब्ध नाही. जरी घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र. १२ शाबीत झाला असेल तरी त्यावरून आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हे निष्काळजीपणे चालविल्याचे शंकेच्या पलीकडे सिध्द होत नाही. वरील सर्व विवेचनावरून घटनेमध्ये शंका उत्पन्न होते.

**१७.** वरील सर्व कारणमिमांसेवरून, दिनांक १३/०५/२०२५ रोजी १४.३० वाजताचे दरम्यान मौजे कापडे बु. गावचे हद्दीत, ता. पोलादपुर, जि. रायगड येथे आरोपीच्या ताब्यातील ॲक्टीव्हा क्रमांक एमएच–०६/सीआर–८०६४ ही वाहतुकीच्या नियमांकडे तसेच रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने किंवा बेदकारपणे आणि विनापरवाना चालवुन मानवी जिवितास धोका पोहचेल अशा पध्दतीने चालविली व पाठीमागे बसलेल्या राज विनोद कदम यांच्या मृत्युस कारणीभुत झाला, हे शंकेच्या पलीकडे सिध्द झाले नसल्याने शंकेचा फायदा देवुन आरोपीस निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त होईल. सबब, मुद्दे क्रमांक १ ते ६ यांना 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

## <u>मुद्दा क्र. ७ करीता</u> :–

**१८.** मुद्दे क्रमांक १ ते ६ बाबत नकारार्थी अभिप्राय नोंदविला असल्यामुळे अभियोगपक्षाने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१, १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब) आणि मोटर वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४, ३(१)१८१ खालील शिक्षापात्र अपराध शाबीत केलेला नाही. त्यामुळे आरोपीला वरील अपराधातून दोषमुक्त करणे संयुक्तीक होईल.

**१९.** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाचे विरोधात अपील दाखल झाल्यास त्या अपीलात हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपीने यापुर्वी प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेले वैयक्तिक जातमुचलका व तितक्याच रक्कमेचा जामीन कदबा पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी कायम करणे उचीत ठरेल. सबब, मुद्दा क्र. ७ चे उत्तराकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी यांना भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१, १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब) आणि मोटर वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४, ३(१)१८१ खालील दोषारोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| **२.** | भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाचे विरोधात अपील दाखल झाल्यास त्या अपीलात हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपीने यापुर्वी प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेले रक्कम रू. १५,०००/- वैयक्तीक जातमुचलके व तितक्याच रकमेचा जामीन कदबे केवळ पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी कायम करण्यात येत आहेत. |
| *(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)* | |

JADHAV UDAY MAHADEV

Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV
Date: 2026.03.09 16:53:30 +0530

महाड, (यु. एम. जाधव)
दिनांक : ०९/०३/२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav,<br>2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Mahad. |
| Name of Stenographer | :- | Mr. B. T. Deshmukh |
| Date of decision / typed | :- | 09/03/2026 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 09/03/2026 |
| Judgment/order uploaded on | :- | 09/03/2026 |